विभागीयशिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२२१७
वेबसाइट www.dydepune.com
ई-मेल आयडी क्र. dydpune@gmail.com.

---

जाक्र.उमाशि३/पुवि/इ.१२वीप्रवेश/२०१६-१७/ ८८००

दिनांक : १५.०६.२०१६

15 JUN 2016

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,

---------------------------------,

---------------------------------

विषय : <u>शैक्षणिक वर्ष२०१६-१७ मध्ये इयत्ता १२वी प्रवेशासाठी अंमलात आणावयाच्या कार्यपध्दतीबाबत.</u>

उपरोक्त विषयाबाबत विदयार्थी, पालक या कार्यालयाकडे इयत्ता १२ वी वर्गात प्रवेशाबाबत लेखी पत्रान्वये व तोंडी विचारणा करतात. इ.१२वी वर्गात प्रवेश पात्र विदयार्थ्यांला नियमाप्रमाणे रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे काम आपले कनिष्ठ महाविदयाचे स्तरावरुन होत असते. त्यासाठी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

इ.१२वी प्रवेशाबाबत खाली दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन आपल्या स्तरावरुन नियमाप्रमाणे गुणवत्तेनूसार पात्र विदयार्थ्यांस रिक्त जागांच्या मर्यादेत प्रवेश देण्यात यावेत. त्याकरिता या कार्यालयाशी वेगळा पत्रव्यवहार करुन परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

इ.१२वी प्रवेशासाठी मागणी करणारा विदयार्थी स्थानिक कनिष्ठ महाविदयालयातून इ.११वी पास असू नये. म्हणजेच इ.१२वी प्रवेश हा स्थानिक परिसरातील (पुणे व पिंपरीचिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील) असल्यास अमान्य होईल याची नोंद घ्यावी.

**<u>अटी :</u>**

१. शाखा बदल/अभ्यासक्रम बदल व माध्यम बदल करुन एखादया विदयार्थ्यांस इ.१२वीमध्ये आपल्या कनिष्ठ महाविदयालयात प्रवेश हवा असल्यास असा प्रवेश नियमानूसार मान्य करता येईल.

२. इ.१२वीमध्ये बदलीने आलेल्या विदयार्थ्यांना अथवा पुणे व पिंपरीचिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील विदयार्थी प्रवेश मान्य होईल.

उपरोक्त १ ते २ अटींचे अधीन राहून शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७मध्ये कनिष्ठ महाविदयालयीन इ.१२वी वर्गात प्रवेशाबाबतचे काम आपल्या स्तरावरुन करण्यात यावे. इ.१२वी प्रवेशाबाबत या कार्यालयाची लेखी अथवा तोंडी सहमती आणणेबाबत विदयार्थ्यांस/पालकांस या कार्यालयाकडे पाठवू नये.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (www.dydepune.com) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक
पुणे विभाग, पुणे.